REVIEW OF RESEARCH

# "सोलापूर जिल्ह्यातील कापूस शेतीच्या उत्पादकतेतील कल"

डॉ. संतोष एन. कदम[१] , डॉ. श्रीकांत जे. होटकर [२]

१सहयोगी प्राध्यापक, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप .
२ सहाय्यक प्राध्यापक, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना

कापूस व कापसाचा सुती कापडासाठी होणाऱ्या उपयोगाविषयीचे ज्ञान भारतीयांना फार प्राचीन काळापासून आहे. ऋग्वेदात कापसाचा उल्लेख आहे. मनूनेही धर्मशास्त्रात सुती कापडाचा उल्लेख केलेला आहे. माहीत असलेले सर्वात जुने कातलेले सूत मोहों-जो-दडो येथील उत्खननात आढळले आहे. यावरून इ. स. पूर्व ३००० वर्षापूर्वी भारतात कापूस लागवड होत होती असे सिध्द झाले आहे. इ. स. पूर्व १५०० ते इ. स. अठराव्या शतकापर्यंत म्हणजे जवळ जवळ ३,३०० वर्षे भारत कापूस उद्योगात आघाडीवर होता. त्यानंतर मात्र इंग्रज राजवटीत इंग्रज सरकारच्या धोरणामुळे भारतीय कापड उद्योगावर प्रतिकूल परिणाम झाला.

कापूस हे एक जगातील महत्त्वाचे आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाणारे कृषी व औद्यागिक पीक आहे. जगातील सुमारे १०० दशलक्षापेक्षा जास्त कुटुंबे कापूस उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष गुंतलेली आहेत. त्याचप्रमाणे कापसाला पूरक असणाऱ्या सेवा म्हणजे वाहतूक, जिनिंग, गाठी तयार करणे, साठा करू न ठेवणे यासारख्या कामामध्ये कुटुंबातील व्यक्ती व मजुरीवरील कामगार मिळून सुमारे ३५० दशलक्ष लोक कापूस उत्पादन क्षेत्रात सहभागी आहेत. तसेच कापूस शेतीशी संबंधित असणारा जोडधंदा म्हणजे शेती आदाने, यंत्रसामग्री आणि हातमाग व यंत्रमागाच्या सहाय्याने कापडनिर्मिती उद्योगामध्ये कोट्यावधी लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. फक्त महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास राज्यातील २४ जिल्ह्यामधील २२,००० गावातील सुमारे २४ लाख शेतकरी कुटुंबे कापूस उत्पादनात सहभागी झाली आहेत.
महाराष्ट्र राज्यातील अतिपूर्वेकडील आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळल्यास महाराष्ट्र राज्याच्या २४ जिल्ह्यामध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते. त्यामध्ये कापूस हे प्रमुख व्यापारी पीक असून, देशातील कापूस पिकाखालील क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याच्या पहिला क्रमांक तर कापूस उत्पादनाच्या बाबतीत दुसरा क्रमांक आणि कापूस पिकाच्या उत्पादकतेच्या बाबतीत ९ वा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील एकूण कापूस उत्पादन क्षेत्राचे विदर्भ विभाग, मराठवाडा विभाग , खानदेश विभाग आणि दख्खनचे पठार विभाग असे चार विभाग केले जातात. महाराष्ट्र राज्यातील कोकण व अतिपूर्वेकडील आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळल्यास राज्याच्या २४ जिल्ह्यांमध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते.

## अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१) सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्राचा कल अभ्यासने.
२) सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादनक व उत्पादकतेचा कल अभ्यासने.

## अभ्यास पध्दती

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना संशोधकाने विविध प्रकाशित साहित्य-संदर्भग्रंथ, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च अहवाल, महाराष्ट्रातील शेतीचा अहवाल, सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन अवहवाल, इंटरनेट वरील विविध संकेतस्थळे इत्यादी द्वितीयक साधन सामग्रीचा आधार घेतला असून, प्राप्त सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यकतेनूसार संयुक्त वार्षिक वाढीचा दर, टक्केवारी आणि त्यातील बदल इत्यादी सांख्यिकी साधनांचा वापर केला आहे.

## जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था

जिल्ह्यातील बहुसंख्य लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून, जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही शेती प्रधान अर्थव्यवस्था असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या सुमारे ७६ टक्के इतके सर्वाधिक क्षेत्र एकूण अन्नधान्य पिकाने व्यापले आहे. सन १९९० ते २०१७ या कालावधीत दरम्यान सोलापूर जिल्ह्यात एकूण अन्नधान्य पिकांखालील क्षेत्रात २०.११ टक्क्यांनी घटले आहे. तर याचवेळेस नगदी पिके विशेषत: ऊस, कापूस, फळे व भाजीपाला आणि एकूण चारा पिकांखालील

क्षेत्रात वाढ झाली आहे. यावरून जिल्ह्यातील शेतकरी पारंपरिक अशा अन्नधान्य पिकांखालील क्षेत्राऐवजी व्यापारी किंवा नगदी पिके लागवडीखालील क्षेत्रात वाढ करीत असल्याचे दिसून आले आहे.

. जिल्ह्यातील पिकांच्या उत्पादनात अन्नधान्य पिकांचे वर्चस्व असून त्यामध्ये तृणधान्य पिकांचा प्रमुख वाटा असून जिल्ह्याच्या एकूण अन्नधान्य उत्पादनात कडधान्य उत्पादनाचा ९.५६ टक्के वाटा आहे. तसेच जिल्ह्यात उसाचे १,२५,९१,०४५ केन उत्पादन , कापसाचे ७००० गाठींचे उत्पादन झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादन बदलांचा कल पाहिल्यास असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील ऊस, गहू, मका, हरभरा, उडीद, इतर तेलबिया इत्यादीं पिकांच्या उत्पादनाचा कल जरी वाढता असला तरी ज्वारी, बाजरी, तांदूळ, तूर, मूग यासारख्या अन्नधान्याच्या पिकांचा आणि भुईमूग, एकूण तेलबिया आणि कापूस उत्पादनातील घटीचा कल ही चिंतेची बाब ठरत आहे. तसेच जिल्ह्यात ऊस, मका, गहू इत्यादी पिकांची उत्पादकता अधिक आहे. याशिवाय भुईमूग, एकूण कडधान्ये आणि एकूण तेलबियांची उत्पादकता अधिक आहे. त्याचवेळेस जिल्ह्यात तांदूळ, कापूस, तूर, ज्वारी, बाजरी, इतर कडधान्य आणि एकूण अन्नधान्य पिकाची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

## सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्र

सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्राविषयी माहिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १**

**सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्र**

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | वर्षे | क्षेत्र |
|---|---|---|
| १. | १९९०-१९९१ | २६१४ |
| २. | १९९१-१९९२ | २०५६ |
| ३. | १९९२-१९९३ | ३४११ |
| ४. | १९९३-१९९४ | ३७११ |
| ५. | १९९४-१९९५ | ३३८० |
| ६. | १९९५-१९९६ | ३७८६ |
| ७. | १९९६-१९९७ | ४२०६ |
| ८. | १९९७-१९९८ | ५६८६ |
| ९. | १९९८-१९९९ | ५३८२ |
| १०. | १९९९-२००० | ५०२० |
| ११. | २०००-२००१ | ४२०३ |
| १२. | २००१-२००२ | ५६८६ |
| १३. | २००२-२००३ | ५३८२ |
| १४. | २००३-२००४ | ४४९३ |
| १५. | २००४-२००५ | ४५९५ |
| १६. | २००५-२००६ | ५७७७ |
| १७. | २००६-२००७ | ६९९६ |
| १८. | २००७-२००८ | ६९९६ |
| १९. | २००८-२००९ | ४६५० |
| २०. | २००९-२०१० | ३९६४ |
| २१. | २०१०-२०११ | ४३९२ |
| २२. | २०११-२०१२ | ४३९२ |
| २३. | २०१२-२०१३ | ७७५ |
| २४. | २०१३-२०१४ | १८४३ |
| २५. | २०१४-२०१५ | ३५६७ |
| २६. | २०१५-२०१६ | ७२१ |

| | | |
|---|---|---|
| २७. | २०१६-२०१७ | ४७५ |
| | संयुक्त वार्षिक वाढीचा दर | -३.१९ |

स्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन

वरील तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्र दर्शविली आहे. जिल्ह्यात सन १९९९०-९१ मध्ये २६१४ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली होते, त्यापुढे सन २००७-०८ पर्यत काही वर्षांचा अपवाद वगळता सातत्याने वाढ होऊन सन २००७-०८ मध्ये ६९९६ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली होते. त्यानंतर मात्र जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होऊन सन २०१६-१७ मध्ये जिल्ह्यात फक्त ४७५ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली असून, सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीतील जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्राच्या संयुक्त वार्षिक वाढीचा दर ऋण ३.१९ टक्के राहिला आहे. पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण, शेती आदानांच्या किमतीत वाढ, परंतु त्याप्रमाणात कापसाला न मिळणारी किंमत यामुळे जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाऐवजी इतर पिकांकडे वळू लागल्याचे दिसून येते.

## सोलापूर जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र

कापूस हे एक असे व्यापारी पीक आहे की, जे कोरडवाहू आणि ओलिताखालील शेतजमिनीत त्याची लागवड केली जाते. त्यामुळे या ठिकाणी जिल्ह्यातील एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्रापैकी ओलिताखालील कापूस क्षेत्राची माहिती घेणे गरजेचे ठरते. पुढील तक्त्यामध्ये ती दर्शविली आहे.

**तक्ता क्र. २**

**सोलापूर जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र**

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | वर्षे | ओलिताखालील क्षेत्र | टक्केवारी (कापसाखालील एकूण क्षेत्राशी) |
|---|---|---|---|
| १. | १९९०-१९९१ | १८८८ | ७२.२३ |
| २. | १९९१-१९९२ | १४५५ | ७०.७७ |
| ३. | १९९२-१९९३ | २२०० | ६४.५० |
| ४. | १९९३-१९९४ | २६१० | ७०.३३ |
| ५. | १९९४-१९९५ | २७२० | ८०.४७ |
| ६. | १९९५-१९९६ | ३२८३ | ८६.७१ |
| ७. | १९९६-१९९७ | ३३२१ | ७८.९५ |
| ८. | १९९७-१९९८ | ३७०० | ६५.०७ |
| ९. | १९९८-१९९९ | ३८४० | ७१.३४ |
| १०. | १९९९-२००० | ३६९० | ७३.५० |
| ११. | २०००-२००१ | ३७२१ | ८८.५३ |
| १२. | २००१-२००२ | ३७०० | ६५.०७ |
| १३. | २००२-२००३ | ३८०० | ७०.६० |
| १४. | २००३-२००४ | ३६८० | ८१.९० |
| १५. | २००४-२००५ | ३७२० | ८०.९५ |
| १६. | २००५-२००६ | ४६९० | ८१.१८ |
| १७. | २००६-२००७ | ४७९६ | ६८.५५ |
| १८. | २००७-२००८ | ४७९६ | ६८.५५ |
| १९. | २००८-२००९ | ३८४४ | ८२.६६ |
| २०. | २००९-२०१० | २१०० | ५२.९७ |
| २१. | २०१०-२०११ | २१०० | ४७.८१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | २०११-२०१२ | २१०० | ४७.८१ |
| २३. | २०१२-२०१३ | ७७५ | १००.०० |
| २४. | २०१३-२०१४ | १८४३ | १००.०० |
| २५. | २०१४-२०१५ | ३५६७ | १००.०० |
| २६. | २०१५-२०१६ | ७२१ | १००.०० |
| २७. | २०१६-२०१७ | ४७५ | १००.०० |
| | संयुक्त वार्षिक वाढीचा दर | -२.६३ | -१.२ |

स्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन

वरील तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र, कापूस पिकांखालील क्षेत्राशी ओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण दर्शविली आहे. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यातील १८८८ हेक्टर कापसाचे क्षेत्र ओलिताखाली होते. त्यानंतर पुढे सन २००७-०८ पर्यंत त्यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन ते ४७९६ हेक्टर क्षेत्र पर्यंत गेले. परंतु त्यानंतरच्या काळात त्यामध्ये घट होऊन सन २०१६-१७ मध्ये जिल्ह्यातील फक्त ४७५ हेक्टर कापूस पिकाचे क्षेत्र ओलिताखाली आहे.

सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत एकूण कापूस पिकांखालील क्षेत्रापैकी ओलिताखालील कापूस शेतीचा विचार केल्यास आपणास असे दिसून येते की, सन १९९०-९१ मध्ये कापसाचे ७२.२३ टक्के क्षेत्र ओलिताखाली होते, पुढे सन २०८-०९ पर्यंत त्यामध्ये काही वर्षांचा अपवाद वगळता वाढ होत जाऊन सन २००८-०९ मध्ये ८२.६६ टक्के कापसाचे क्षेत्र ओलिताखाली होते. त्यानंतरच्या काळात जरी ओलिताखालील कापसाच्या क्षेत्रात घट झाली. परंतु सन २०१६-१७ मध्ये मात्र जिल्ह्यातील कापूस लागवडीपैकी १०० टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. म्हणजे मुळात सन २०१६-१७ मध्ये जिल्ह्यात फक्त ४७५ हेक्टर क्षेत्रावरच कापसाची लागवड झाली आहे, ज्याचे ओलिताखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण १०० टक्के झाले आहे. सन १९९०-९१ ते सन २०१६-१७ या कालावधीतील जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाच्या क्षेत्राचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर ऋण २.६३ टक्के राहिला आहे. तर जिल्ह्यातील एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्राशी ओलिताखालील कापूस क्षेत्राच्या टक्केवारीचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर दखील ऋण १.२ टक्के राहिला.

## सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाचे उत्पादन

सोलापूर जिल्ह्यातील कोरडवाहू आणि ओलिताखालील क्षेत्रातील कापूस पिकाच्या उत्पादनाची माहिती पुढील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ३**

**सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाचे उत्पादन**

| अ.क्र. | वर्षे | उत्पादन ('००' गाठीमध्ये) |
|---|---|---|
| १. | १९९०-१९९१ | २४ |
| २. | १९९१-१९९२ | ३६ |
| ३. | १९९२-१९९३ | ६५ |
| ४. | १९९३-१९९४ | २९ |
| ५. | १९९४-१९९५ | ३२ |
| ६. | १९९५-१९९६ | ५५ |
| ७. | १९९६-१९९७ | ६५ |
| ८. | १९९७-१९९८ | ७३ |
| ९. | १९९८-१९९९ | ६८ |
| १०. | १९९९-२००० | १०२ |
| ११. | २०००-२००१ | ११२ |
| १२. | २००१-२००२ | ३५ |
| १३. | २००२-२००३ | ७५ |
| १४. | २००३-२००४ | ७८ |



LBP PUBLICATION

| | | |
|---|---|---|
| १५. | २००४-२००५ | ६५ |
| १६. | २००५-२००६ | ७० |
| १७. | २००६-२००७ | ८२ |
| १८. | २००७-२००८ | ८२ |
| १९. | २००८-२००९ | ६० |
| २०. | २००९-२०१० | ५४ |
| २१. | २०१०-२०११ | ३३.९ |
| २२. | २०११-२०१२ | २५.३ |
| २३. | २०१२-२०१३ | ३.४६ |
| २४. | २०१३-२०१४ | २७८ |
| २५. | २०१४-२०१५ | ९९३ |
| २६. | २०१५-२०१६ | १०२ |
| २७. | २०१६-२०१७ | ७० |
| | संयुक्त वार्षिक वाढीचा दर | २.७९ |

स्रोत - १) सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन
२) सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रीसर्च - http//:www.cicr.org.in/Database/ dbcapp३.html

वरील तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील कापूस पिकाचे उत्पादन दर्शविले आहे. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात २४०० कापूस गाठींचे उत्पादन झाले होते. त्यापुढील काळात सन २००७-०८ पर्यंत सन २००१-०२ चा अपवाद वगळता कापसाच्या उत्पादनात वाढ होत गेल्याचे दिसून येते. परंतु सन २००८-०९ पासून सन २०१२-२०१३ जिल्ह्यातील कापूस उत्पादनात घट होताना दिसते. त्यानंतर मात्र वाढ झाल्याचे दिसून येते, परंतु सन २०१६-१७ मध्ये जिल्ह्यात फक्त ७००० कापूस गाठींचे उत्पादन झाले आहे. सन १९९०-९१ ते सन २०१६-१७ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादनाचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर २.७९ टक्के राहिला आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची उत्पादकता

सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादकतेची माहिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ४**

**सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची उत्पादकता**

(प्रतिहेक्टरी कि.ग्रॅ. मध्ये)

| अ.क्र. | वर्षे | उत्पादकता |
|---|---|---|
| १. | १९९०-१९९१ | १५६ |
| २. | १९९१-१९९२ | २९७ |
| ३. | १९९२-१९९३ | ३२४ |
| ४. | १९९३-१९९४ | १२४ |
| ५. | १९९४-१९९५ | १६५ |
| ६. | १९९५-१९९६ | २४७ |
| ७. | १९९६-१९९७ | २६३ |
| ८. | १९९७-१९९८ | २१९ |
| ९. | १९९८-१९९९ | २१५ |
| १०. | १९९९-२००० | ३४५ |
| ११. | २०००-२००१ | २९२ |

LBP PUBLICATION

| | | |
|---|---|---|
| १२. | २००१-२००२ | १४९ |
| १३. | २००२-२००३ | २९० |
| १४. | २००३-२००४ | २९५ |
| १५. | २००४-२००५ | २४० |
| १६. | २००५-२००६ | २०६ |
| १७. | २००६-२००७ | १९९ |
| १८. | २००७-२००८ | १९९ |
| १९. | २००८-२००९ | २१९ |
| २०. | २००९-२०१० | २३२ |
| २१. | २०१०-२०११ | १३१ |
| २२. | २०११-२०१२ | ९८ |
| २३. | २०१२-२०१३ | ७६ |
| २४. | २०१३-२०१४ | २४२ |
| २५. | २०१४-२०१५ | २९८ |
| २६. | २०१५-२०१६ | १९२ |
| २७. | २०१६-२०१७ | १९८ |
| | संयुक्त वार्षिक वाढीचा दर | -१.०९ |

स्रोत - १) सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन
२) सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रीसर्च -
http//:www.cicr.org.in/Database/ dbcapp३.html

वरील तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची प्रतिहेक्टरी उत्पादकता दर्शविला आहे. सन १९९०-९१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची प्रतिहेक्टरी उत्पादकता १५६ कि.ग्रॅ. होती, तर त्यापुढील काळात सन २००३-०४ पर्यंत महाराष्ट्राच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्याची कापूस पिकाची उत्पादकता सन १९९३-९४ आणि सन २००१-०२ या दोन वर्षांचा अपवाद वगळता अधिकच असल्याचे दिसून येते. परंतु त्यानंतर सन २००४-०५ पासून सन २०१२-१३ सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेत मात्र घट झाल्याचे दिसून येत असली तरी २०१३-१४ पासून त्यामध्ये वाढ झाली असून, २०१६-१७ मध्ये सोलापूर जिल्ह्याची प्रतिहेक्टरी कापूस उत्पादकता १९८ कि.ग्रॅ. आहे.

सन १९९०-९१ ते २०१६-१७ या कालावधीत जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादकतेच्या संयुक्त वार्षिक वाढीचा दर १.०९ टक्क्यांनी घटला आहे. ही जिल्ह्यातील कापूस शेती अर्थव्यवस्थेबाबत चिंतन करण्याची बाब आहे. कारण देशात आणि राज्यात बीटी बियाणांसारख्या सुधारित तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कापसाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढत असताना सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेत घट होत चालली आहे.

## सारांश

मागील काही वर्षात जिल्ह्यातील पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण, तसेच शेती आदाने व मजुरीच्या दरातील वाढीमुळे कापूस पिकाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. परंतु त्याप्रमाणात कापसाला मिळणाऱ्या दरात वाढ न झाल्याने जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाऐवजी इतर पिकांकडे वळू लागल्याने जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्रात घट झाल्याचे दिसून येते. तसेच येथील कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाची लागवड शक्यतो ओलिताखालील क्षेत्रात करत असल्याने व त्यासाठी सुधारीत आदानांचा वापर करु लागल्या कापूस उत्पादनात वाढीचा कल जरी दिसत असला तरी दर हेक्टरी कापूस उत्पादकेता कल मात्र घटता असल्याचे आढळून येते.

जिल्ह्यातील नैसर्गिक स्थिती कापूस पिकासाठी अनुकूल असल्याने कापूस पिकाखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना कापूस शेतीचे महत्त्व व फायदे माहित करून देणे गरजेचे आहे. तसेच कापूस पिकाच्या लागवडीचा खर्च कमी करण्यासाठी यंत्राच्या सहाय्याने पेरणी करणे, शेतीला ठिबक सिंचनाने पाणी देणे, कापूस वेचणीसाठी यंत्राचा वापर करणे, गावामध्ये कापूस खरेदी केंद्र स्थापन करणे, कापूस पेरणीच्यावेळी संस्थात्मक मार्गाने वेळेवर कर्ज पुरवठ्याची व्यवस्था करणे, बाजारपेठेतील मध्यस्थांवर नियंत्रण ठेवणे, शेती आदानांच्या किंमती कमी करणे, यासाठी शासनाने अनुदान उपलब्ध करून द्यावे, कापूस उत्पादनात वाढ करण्यासाठी सुधारित बीटी कापूस बियाणांचा वापर करणे,

कापसाचा किमान दर वाढवून देणे गरजेचे आहे. तसेच कापूस दर्जा व दराबाबत निश्चित असे नियम असले पाहिजेत, कापूस शेतीविषयक मार्गदर्शन व सल्ला देणारी यंत्रणा स्थापन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना कापूस शेतीची माहिती, शेती करीत असताना येणाऱ्या समस्या व उपाययोजना सुचविण्यासाठी चर्चासत्रे, व्याख्याने आणि कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

### संदर्भ

1. Dr. V. Santhanam and Dr. V. Sundarm (1997), 'Agri – History of Cotton in India – An Overview', downloaded from - www. Cicr.org./resea rch.notes/cotton_history _india.pdf. on 14 Feb.2014.
2. Dinkar Baban Chavan (2009), 'A Study of Problems of Cotton Growers Farmers (With Special Reference To Phulmbri Taluka)', (unpublished Ph.D. thesis), University of Pune, Pune, downloaded from –http://dinkarchava.blospot.in/2011/07/study- of-problems-of-cotton-growers.htm. on 23 March 2014.
3. Sanjaykumar Jagannath Patil and Dr. Mrs. Meenakshi Waykole (2013), 'Status of Cotton Global to Khandesh', Global Research Analysis, Vol.2, Issue 12, pp. 137-138, downloaded from – http://worldwidejournals.com/gra/file.php?vol=December_2013_1387275878_75066_43.pdf. on 10 Dec. 2014.
4. Dr. Santosh N. Kadam (2009), 'New Agricultural Technology: Socio- Economic Impact', Reliance Publishing House, New Delhi.
5. Central Institute for Cotton Research, downloaded from - http: // www.cicr.org.in on 20 March 2015.
6. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन १९९० ते २०१७.

LBP PUBLICATION